# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र.मुमाआ/नों.क्र.६९०९ ते ६९११ / २१ /अ.क्र.२६६८ ते २६७० /२६

श्री. फिरोज उस्मान शेख
वार्ड नं.२, माऊली किरणाजवळ अहिल्यादेवीनगर,
श्रीरामपूर ता.श्रीरामपूर पिन-४१३७०९.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपीक, उत्तर मुंबई (सा.बां.)
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग,
दादाभाई नौरोजी मार्ग, अंधेरी (प.), मुंबई-४०००५८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई
(सा.बां.) कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग,
दादाभाई नौरोजी मार्ग, अंधेरी (प.), मुंबई-४०००५८

**<u>द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २३.०३.२०२६</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २०.०२.२०२१ | ०३.०३.२०२१ | २३.०३.२०२१ | -- |

प्रस्तुत तीनही प्रकरणी अपिलार्थींनी दाखल केलेल्या **जोडपत्र अ** नुसार सन २०१८-१९ या कालावधीत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंधेरी (पश्चिम) यांनी केलेल्या कामांच्या, वर्क ऑर्डरच्या, छायांकित प्रती व अदा केलेल्या बिलांच्या छायांकित प्रती **अपिल क्रमांक २६६९ :-** यात श्री.अनिल मराठे, शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम, उत्तर विभाग, अंधेरी यांनी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात मजूर संस्थांची सादर केलेली बिले, एम.बी., त्या कामांची केलेली तपासणी, टिप्पणी याच्या छायांकित प्रती मागितल्या आहेत. तर **अपील क्रमांक २६७० :-** यात श्री.अनिल मराठे, शाखा अभियंता यांनी सन २०१९-२० या कालावधीत देखभाल, दुरुस्ती, रंगरंगोटी, फर्निचर या कामाची वरिष्ठ कार्यालयात सादर केलेली बिले कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, उत्तर विभाग, अंधेरी (पश्चिम) यांनी केलेल्या तपासणी, टिप्पणीच्या छायांकित प्रती मागितलेल्या आहेत. या सर्व प्रकरणात तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी अनुक्रमे दि.२३.११.२०२०,

०३.०३.२०१ व ०४.०३.२०२१ रोजी अपिलार्थीना अनुक्रमे दि.०१.१२.२०२०, १५.०३.२०२१ रोजी माहितीचे निरीक्षण करण्याकरीता बोलविले. मात्र अपिलार्थीनी त्यानंतर म्हणजेच दिनांक २३.०३.२०२१ रोजी प्रथम अपील अर्ज सादर केला तो कार्यालयास दिनांक ३१.०३.२०२१ रोजी प्राप्त झालेला आढळून येतो. त्यावर दिनांक २५.०६.२०२१ रोजी ०६.०७.२०२१ या दिनांकाला प्रथम अपील सुनावणीसाठी उपस्थित राहण्याबाबत कळविले होते व त्या सुनावणीस अपिलार्थी हजर होते. प्रथम अपिलिय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई सार्वजनिक बांधकाम विभाग, अंधेरी यांनी असा निर्णय दिला की, अपिलार्थीनी मागणी केलेल्या माहितीचे निरीक्षण करण्याकरीता पुन:श्च एकदा संधी देण्यात येत असून त्यांनी दिनांक २८.०७.२०२१ रोजी जन माहिती अधिकाऱ्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून हव्या असलेल्या नस्तीमधून पृष्ठांना पताका लावून दिल्यानंतर व त्याचे शुल्क भरणा केल्यानंतर सदर माहिती जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपिक, उत्तर मुंबई, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंधेरी यांनी अपिलार्थीना प्रदान करावी. याविरुद्ध दिनांक १०.०६.२०२१ रोजी अपिलार्थीनी प्रथम अपील आदेश प्रदान करण्यात आला नसल्याचे तसेच माहिती देण्यास टाळाटाळ करण्यात आली असून एकाच प्रकारचे साचेबंद उत्तर दिले असल्याचा आक्षेप नोंदवीत प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दाखल केलेला आहे.

तथापि, अपिलार्थी हे अपिलीय सुनावणीस हजर नसल्याचे आढळून येते. तसेच त्यांना माहितीचे निरीक्षण देण्याकरिता एक अतिरिक्त संधी देखील देण्यात आली होती व हव्या असलेल्या नस्तीमधील पृष्ठांना पताका लावून दिल्यानंतर, त्याचे शुल्क भरणा केल्यानंतर त्यांना माहिती द्यावी असे निर्देशित केल्याचे आढळून येते.

अपिलार्थीनी सर्व द्वितीय अपील अर्जात आदेश प्राप्त झाले नसल्याचे नमूद केले. तथापि, अपिलार्थीनी भारतीय डाक विभागामार्फत आठवड्याभराने पोच पावती ही कार्यालयास प्राप्त झाली असून सोबत पोच पावतीची छायांकित प्रत देखील सादर करण्यात आलेली आहे.

वरील सर्व प्रकरणात प्राधिकरणातर्फे अपिलार्थीनी त्यांच्या जोडपत्राच्या अनुषंगाने सकारात्मक प्रतिसाद दिला असून माहितीचे अवलोकन करण्याबाबत जन माहिती अधिकारी स्तरावर तसेच अपिलीय अधिकारी स्तरावर सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याचे आढळून येते. मात्र अपिलार्थीनी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी संधी दिल्यानंतरही माहितीचे अवलोकन केले नसल्याचे प्रत्यक्षात आढळून येत असून आज झालेल्या सुनावणीस अपिलार्थी गैरहजर आहेत. मागितलेली माहिती ही साधारण सन २०१९-२० या कालावधीतील असून जन माहिती अधिकारी व अपिलिय अधिकाऱ्यांनी कोविड कालावधीत देखील या संदर्भात दिलेला प्रतिसाद लक्षात घेता व अपिलार्थीनी त्यानंतर माहितीचे कुठलेही निरीक्षण व अवलोकन घेतले नसल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता उपरोक्त माहिती प्राप्त करून घेण्यास अपिलार्थीना कुठलेही स्वारस्य नसल्याचे प्रथमदर्शनी आढळून येते. तथापि, यातील जी माहिती **कलम ४ (१) (ख)** प्रमाणे प्राधिकरणाने स्वयंप्रेरणेने उघड

करणे आवश्यक आहे ती माहिती सार्वजनिक बांधकाम विभाग, उत्तर मुंबई, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या संकेतस्थळावर सर्वच नागरिकांसाठी माननीय सर्वोच्च न्यायालय यांच्या किशनचंद जैन विरुद्ध युनियन ऑफ इंडिया **WP (civil) number 990 of 2021** या प्रकरणात पारित केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने विनामूल्य उपलब्ध करून देण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

१. **वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

२. **अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : २३-०३-२०२६**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission Maharashtra

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र